नि.फौ.ख.क्र.२१/२०२४

सरकार -वि- सुनंदा **नि.क्र. २०**

<u>**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – सयाबाई बाळाजी कडव

वय. ७० वर्षे, व्यवसाय – काही नाही,

निवासस्थान – जुना शहर मोडी रोड आझाद वार्ड, तुमसर ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

<u>**सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील यांच्या मार्फत –**</u>

मी माझे भावाच्या घरी तुमसर येथे राहते. मी आरोपीला ओळखतो. ती माझे भावाच्या घरा शेजारीच राहते. घटना अंदाजे तीन वर्षाआधी माझे भावाच्या घरी सकाळी १०.०० वाजता घडली होती. त्यावेळी मी कारले तोडत होती. आरोपीने तिचे भिंतीवर पाणी मारतांना ते पाणी माझे अंगावर पडले. त्यावर मी तिला ''भोकाचा पाणी मारतेस कां'' असे म्हणाली. त्यावर आमच्या दोन–दोन गोष्टी झाल्या. त्यानंतर आरोपी माझ्या घरी आली. तिने माझे केसं आढले. त्यानंतर तिने एक दगड आणुन माझ्या डोक्यावर मारहाण केली. त्यानंतर मी पोलिस ठाण्यात गेली. तेथुन मला दवाखान्यात नेण्यात आले. पोलिसांना मी घटनेबाबत माहिती दिली होती. आता मला अभिलेखावरील फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे पोलिसांनी नमुद केलेला आहे. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. फिर्यादीस **निशाणी २१** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २२** देण्यात येते. जप्त दगड दाखविल्यास मी ओळखु शकते.

**याठिकाणी सहा. सरकारी अभियोक्ता यांनी जप्त मुद्येमाल न्यायालयात आलेले नसल्यामुळे सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्याची विनंती केली. त्यांचे तोंडी विनंतीवरून सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येते.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. २१.०२.२०२६ | दि.२१.०२.२०२६ |